

## साताऱ्याचा नवा चेहरा 'चैतू'!

साताऱ्यातील प्रसिद्ध नकलाकार आणि जादूगार सुरेंद्र माजगांवकर यांची कन्या चैताली उर्फ चैतू रंगभूमी गाजवत आहे. साताऱ्याची कन्या असलेल्या चैतूची ओळख करून देणारा लेख.

दै. ऐक्य ५/७/२०३



# साताऱ्याचा नवा चेहरा 'चैतू'!



बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, या म्हणीप्रमाणे साताऱ्यातीलच चैताली उर्फ चैतू माजगांवकर हिचा कला प्रवास वयाच्या तिसऱ्या/चौथ्या वर्षापासूनच सुरु झाला. प्रथम तिने महाभारतातील शकुनीमामा या व्यक्तिरेखेद्वारे आपल्या संवेदनशील अभिनयाची चुणूक दाखवली. वडील सुरेंद्र माजगावकर यांच्याकडून जादू व नकला या कला आत्मसात केल्या.

साताऱ्याचे प्रसिध्द जादूगार सुनीलकुमार (काका) व वडील कार्यक्रम करत असत. त्यावेळी चैतू त्यांच्यासोबत जात असे. याबाबत ती म्हणते, "मी लहानपणापासूनच या कार्यक्रमाला जात असे. त्यातील वडिलांच्या नकला पाहून खूपच प्रोत्साहन मिळे. स्पष्टवक्तेपणा अंगातच मुरलेला होताच पण त्याचबरोबर वंशपरंपरागतची कलेची देणगीही मला मिळाली. आईवडिलांनी याबाबत खूपच मदत केली. प्रोत्साहन दिले. त्यामुळं लहानपणापासूनच अनेक वक्तृत्व, फॅन्सीड्रेस स्पर्धा मी गाजवू शकले.

आज वयाच्या विसाव्या वर्षी चैतू स्वतंत्रपणे या कलाविष्काराचा प्रयोग करत आहे. 'गंमत जंमत' हा स्वतःचा कार्यक्रम तयार करुन स्वतःचे व्यासपीठ तिनं निर्माण केले. हे कार्यक्रम सुरु असतानाच ती नाट्यकाकडेही आकर्षित झाली. नाटकाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेण्याकरिता ती आज पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रामध्ये बी. ए. नाट्यशास्त्र करीत आहे.

ललित कला केंद्रामध्ये तिने महाकवी शुद्रक लिखित 'मृच्छकटिकम्' नाटकात रोहसेनाची भूमिका केली होती तर 'बकरी' नाटकामध्ये तिने बकरी हुबेहूब साकारुन सर्वांचे कौतुक मिळवले. त्यानंतर 'रिक्षावाला', 'तारत्युफ', 'ब्रान्द', 'तू बेडा कुंभार', 'इफीजेनिया', 'कोठून कोठे', 'दोघे मित्र', 'आम्हा घरी धन', 'इस्ट साईड स्टोरी' आदी नाटकात चैतूने वैशिष्ट्यपूर्ण भूमिका रंगवल्या आहेत. विभागप्रमुख व नाटककार सतीश आळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तिने 'गोष्ट प्रेमाची' या नावाची विनोदी एकांकिकाही लिहिली व दिग्दर्शित केली आहे. विजय तेंडुलकरांची 'काही खरं नव्हे' ही एकांकिका सुध्दा दिग्दर्शित केली आहे. विजय केंकरे दिग्दर्शित 'मिडीआ' व 'चोरीचा मामला' यामध्येही चैतूने सुरेख असा अभिनय सादर केला होता.

तर वाचिक अभिनयाकरिता चैतूला ज्योती सुभाष, नेपथ्य राजन पिसे, वेशभूषा निरजा पटवर्धन, दिग्दर्शनाकरीता सतीश आळेकर, वामन केंद्रे, विजय केंकरे, जब्बार पटेल यांचे मार्गदर्शन चैतूला लाभले आहे.

नकला व जादू यांचा 'गंमत जंमत' नावाचा दीड तासाचा कार्यक्रम ती गावोगावी समारंभात, महोत्सवात सादर करते आहे. आजपर्यंत या कार्यक्रमाचे शंभरच्यावर यशस्वी प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रभर पुणे, औरंगाबाद, चिंती, मुंबई, रहिमतपूर इत्यादी ठिकाणी तिने सादर केले आहेत.

अशा या चैतूला नकलेशिवाय चित्रकला, पेटीवादन करायला आवडते. संगीत ऐकायला तर खूपच आवडते. पुढील करियरसाठी मुंबईला जाण्याचा तिचा इरादा आहे. मालिका व नाटकातून तिला कामे करण्याची इच्छा आहे. पण तिला खरी ओढ आहे ती नकलाकार होण्याची. नावलौकिक मिळालेली एकही महिला नकलाकार नाही. त्यामुळं महिला नकलाकार म्हणून लौकिक मिळवण्याची तिची महत्त्वाकांक्षा आहे.

संपर्क : ९४२२४०१५३९

सातारा : ०२१६२-२८१५३९.